# जिल्हा परिषद, कोल्हापूर

# स्वच्छ भारत मिशन ग्रा. टप्पा II

# गोबरधन बायोगॅस प्रकल्प

## (Gobardhan Biogas Project)

## ग्रामपंचायत माणगांव, तालुका हातकणंगले,
## जिल्हा कोल्हापूर

# पथदर्शी गोबरधन प्रकल्प ,
# ग्रामपंचायत माणगांव, तालुका हातकणंगले
# जिल्हा कोल्हापूर.




स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा 2 अंतर्गत, केंद्र शासना मार्फत जिहयासाठी एक पथदर्शी गोबरधन प्रकल्प उभारणेत आला आहे. कोल्हापूर जिल्हयात ग्रामपंचायत माणगांव, तालुका हातकणंगले येथे हा प्रकल्प उभारणेत आला आहे. शासनाच्या निकषानुसार या ग्रामपंचायतीची निवड करणेत आली आहे.

माणगांव ग्रामपंचायतीमध्ये एकूण 6 वार्ड आहेत. गावाची कुटुंब संख्या 2800 इतकी आहे. तसेच गावामध्ये 150 बचत गट कार्यरत आहेत.

# गोबरधन प्रकल्पाचा मुख्य उद्देश

गावातील संकलित होणारा कचरा एकत्रित करुन सदर कच-यापासुन बायोगॅस निर्मिती करुन, बायोगॅस पासुन वीजनिर्मिती करणे आहे.

## प्रकल्पाची माहिती :-

- हा प्रकल्प 1.50 TON/DAY क्षमतेचा असून, 100 ते 120 CUM/DAY बायोगॅस निर्मिती होते.
- प्रकल्पाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 46.71 लक्ष आहे.
- उर्जा बायोटेक लि. पुणे यांचेकडुन या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) करणेत आला आहे.
- या प्रकल्पामधुन 100 ते 120 युनिट वीजनिर्मिती करणेची क्षमता आहे.
- प्रकल्पामधुन 4000 लिटर जैविक खत व स्लरी ची निर्मिती होणार आहे.

# कचरा संकलन नियोजन

• माणगांव ग्रामपंचायतीकडे कचरा संकलनासाठी आवश्यक यंत्रणा उपलब्ध आहे.

• गावातुन एकुण 2800 कुटुंबाकडुन संकलन होणारा कचरा आणि हॉटेल व्यावसाईक यांच्या कडुन प्रति दिन एकुण 1.20 टन कचरा संकलन होतो.

• गावामध्ये 150 बचत गट कार्यरत आहेत या बचत गटांना वार्ड निहाय ओला सुका कचरा वर्गीकरण बाबत नियोजन देणेत आले आहे.

• सदर वर्गीकरण केलेला कचरा ग्रामपंचायतींच्या कचरा संकलन वाहनातुन प्रकल्प स्थळी पोहोचविणेत येत आहे.

• सदर कच-यामध्ये घरगुती कचरा, बाजार पेठातील कचरा , हॉटेल मधील कचरा यांचा समावेश होतो.



# गोबरधन प्रकल्पामुळे झालेले फायदे

•गोबरधन प्रकल्पात कच-या पासुन निर्मिती होणा-या बायोगॅस हा घरगुती वापरासाठी 50 कुटुंबांना विनामोबदला देणेत आला आहे.

•प्रकल्पामध्ये बायोगॅस पासुन निर्माण होणारी विज गावातील 100 पथदिव्यासाठी वापरली जात आहे. यामुळे ग्रामपंचायतीच्या अंदाजे प्रति महिना 10 ते 15 हजार रुपये इतकी खर्चाच बचत होणार आहे.

•प्रकल्पातुन निघणारे जैविक खत व स्लरी शेतीसाठी उपयुक्त असल्याने , यातुन ग्रामपंचायतीला प्रति महिना 20000 इतके उत्पन्न मिळणार आहे.

gobardhan
कचरे से कंचन






ग्रामपंचायत माणगांव येथील गोबरधन प्रकल्पामुळे गावातील कचरा व्यवस्थापन योग्य प्रकारे होत असुन, यामुळे गावामध्ये दृष्यमान स्वच्छता आहे. प्रकल्पातुन बायोगॅस, विज निर्मिती आणि खत यातुन ग्रामपंचायतीला आर्थिक उत्पन्न मिळणार आहे. या प्रकल्पास जिल्हयातील ग्रामपंचायती पाहण्यासाठी व माहिती घेण्यासाठी भेट देत आहेत.







**मा. आमदार श्री. प्रकाश आवाडे, यांच्या हस्ते गोबरधन प्रकल्पाचे उद्धाटन**

स्वच्छ भारत

एक कदम स्वच्छता की ओर